दावा दाखल दि. १२-०१-२०१८
दावा रजिष्टर दि. १२-०१-२०१८
दावा निकाल दि. ०७-०६-२०१८
कालावधी – वर्ष – म.– दि.
००   ०४   २५

**न्यायाधीश, सहकारी न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. १/२०१८

**समक्ष, श्री. बी. एस. लखोटे, न्यायाधीश**

जय ज्योती जय क्रांती महिला अर्बन क्रेडिट को.
सोसायटी मर्यादित, शेगाव, नोंदणी क्र. ९८६,
तह. शेगाव, जिल्हा – बुलडाणा,
तर्फे : व्यवस्थापक – गणेश राजेंद्र गणगणे. ............................ **वादी**

**विरुध्द**

1) दिपक गजानन हाडोळे,
वय – २६ वर्षे, धंदा – व्यापार,
रा. फुले नगर, शेगाव,
तह. शेगाव, जिल्हा- बुलडाणा.

2) सौ. उषा कैलाश वानखडे,
वय – ३८ वर्षे, धंदा – घरकाम,
रा. गजानन आइस फॅक्टरी जवळ, शेगाव,
तह. शेगाव, जिल्हा- बुलडाणा.

3) श्रीराम ज्ञानदेव मसणे,
वय – २९ वर्षे, धंदा – ड्रायवर,
रा. दसरा नगर, शेगाव,
तह. शेगाव, जिल्हा- बुलडाणा. .................................... **प्रतिवादी**

**दावा रक्कम रु. ४३,१२३/- वसुलीकरीता**

वादीकरीता ॲड. श्री. पी.पी. भोंगळ.
प्रतिवादी - गैरहजर-एकतर्फी

## <u>निकालपत्र</u>

वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणे

१. वादी संस्था महाराष्ट सहकारी संस्था अधिनियम अंतर्गत रजिष्टर असुन प्रतिवादी वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र. १ यांनी दिनांक १२-०६-२०१५ रोजी रु.३०,०००/- कर्ज घेतले.

२. प्रतिवादी क्र. २ व ३ हे प्रतिवादी क्र. १ च्या कर्जास जामिनदार आहेत. प्रतिवादीने कर्ज रकमेवर द.सा.द. शे. १५ टक्के प्रमाणे व्याज देण्याचे मान्य केले. प्रतिवादीने वादीच्या हक्कात कर्ज कागदपत्रे करुन दिले.

३. प्रतिवादीने कर्जाची रक्कम भरणा केली नाही म्हणुन वादीने प्रतिवादींना कर्ज मागणी नोटिस दिली. खातेउता-याप्रमाणे दिनांक ३१-०७-२०१७ अखेर रक्कम रु.४२,१२३/- प्रतिवादीकडे बाकी आहेत. वादीने रक्कम रु.१०००/- खर्चाची मागणी केली आहे.

४. प्रतिवादी दाव्यात हजर झाले नाही, त्यामुळे सर्व प्रतिवादी विरुद्ध निशाणी १ वर एकतर्फी आदेश पारित करण्यात आला.

वादीच्या कथनावरुन खलील प्रमाणे मुद्दे निश्चित करण्यात आले आणि माझा निष्कर्ष कारणमिमांसासह खालीलप्रमाणे आहे.

| <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|
| 1. प्रतिवादी व्यक्तीगत व सामुहिकरित्या रु. ४३,१२३/- द.सा.द.शे. १५ टक्के प्रमाणे परतफेड करण्यास जबाबदार असल्याचे वादी सिध्द करु शकते काय ? | होकारार्थी |
| 2. आदेश आणि हुकुमनामा काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

५. वादीने सदरचा दावा प्रतिवादीविरुध्द कर्ज वसुलीसाठी दाखल केला असुन वादीच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी १ यांनी रु.३०,०००/- कर्जाची उचल केली. वादीने दाव्यातील कथनाच्या समर्थ श्री. गणेश राजेंद्र गणगणे संस्थेचे व्यवस्थापक यांचे शपथपत्र दाखल केले. शपथपत्रतील मजकुर हा दाव्यातील मजकुराशी सुसंगत आहे.

६. वादीने नि. ११ ते १४ कडे कर्ज मागणी अर्ज, करार पत्र, वचनचिठठी व नोटिस दाखल केले. दाव्यात दाखल कागदपत्रांवरून असे दिसून येते की प्रतिवादी क्र.१ ने

कर्ज रु.३०,०००/- वादी कडून घेतले व सदर कर्जास प्रतिवादी क्र. २ व ३ जामीनदार आहेत. प्रतिवादी गैरहजर आहेत व त्यांच्या विरूद्ध एकतर्फी आदेश पारित करण्यात आला आहे. वादीच्या पुराव्याला प्रतिवादीने आव्हान दिले नाही.

७. वादीने प्रतीवादी विरुद्ध रक्कम रु.४२,१२३/- मागणी केली आहे. प्रतिवादीने वादीचे मागणीस आव्हान दिले नाही, त्यामुळे वादीची मागणी मान्य करण्यात येत आहे. तसेच वादीची खर्चाची मागणी रक्कम रु.१०००/- मान्य करण्यात येत आहे. वादीने दाव्यात द.सा.द.शे. १५ टक्के व्याजाची मागणी केली. वचनचिठठी नि. १३ व करार पत्र नि.१२ मध्ये द.सा.द.शे. १५ टक्के व्याजाचा उल्लेख आहे त्यामुळे १५ टक्के प्रमाणे व्याज आकारण्यास वादी हकदार आहे.

वरील कारणास्तव वादीचा दावा प्रतिवादी १ ते ३ विरुध्द मंजुर करण्यात येत आहे आणि त्यानुसार मी खालील आदेश पारित करीत आहे.

## **आदेश**

1. वादीचा दावा खर्चासह मंजुर करण्यात येत आहे.

2. प्रतिवादी १ ते ३ यांनी व्यक्तीगत व सामुहिकरित्या रक्कम रु.४३,१२३/- व रक्कम रु.३०,०००/- वर द.सा.द.शे. १५ टक्के प्रमाणे व्याज दिनांक ०१-०८-२०१७ पासुन ते पुर्ण वसुल होईपर्यंत वादीला दयावे.

3. त्यानुसार हुकुमनामा काढण्यात यावा.

ठिकाण अकोला

दिनांक : ०७-०६-२०१८

स्वाक्षरी
(श्री. बी. एस. लखोटे)
न्यायाधीश
सहकार न्यायालय, अकोला